# मुंबई मेट्रो-३ ची चाचणी आजपासून सुरुवात होणार

■ मुंबई

'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३'च्या चाचणीस अखेर उद्या मंगळवार, ३० ऑगस्ट २०२२ पासून सुरुवात होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या सकाळी ११ वाजता एका सोहळ्यात चाचणीला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमधील अधिकाऱ्यांनी दिली. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ चे काम २०२१ मध्ये पूर्ण होण्याची अपेक्षा होती. मात्र विविध कारणांमुळे या प्रकल्पास विलंब झाला.